# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## Health Wellness Clinic (आरोग्य वर्धिनी केंद्र) अंतर्गत

## BAMS वैद्यकीय अधिकारी पदभरती जाहिरात

## शुध्द्रीपत्रक

Health Wellness Clinic (आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी) बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकारी पदभरती करीता दै.सकाळ व दै.देशदूत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर भरतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची मुलाखत ही दिनांक ०७/१२/२०१७ व दिनांक ०८/१२/२०१७ रोजी जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे घेण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु दिनांक ०५/१२/२०१७ रोजी मा.आयुक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त सुधारीत मार्गदर्शक सुचने नुसार निकष बदलण्यात आले असुन त्या निकषां नुसार सदर मुलाखत रद्द करण्यात आलेली आहे. याबाबतच्या पुढील सुचना zpnashik.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येतील.

Deepa
5/12/17

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० 
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५ 
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ ६७४९८-५०७


जा.क्र राआसो /आयुष/HWC/ /२०१७
दि.०५/१२/२०१७

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक, भंडारा, वर्धा.

**विषय – Health Wellness Center- आरोग्यवर्धिनी केंद्र अंतर्गत बीएएमएस वैद्यकिय अधिकारी पदाची मुलाखत प्रक्रियेबाबत.**

संदर्भ – १. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मंजुर PIP.
२ . या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/आयुष/HWC/६३७६६-७६/२०१७ दि.१०/१०/२०१७.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या सन २०१७ -१८ च्या मंजुर पीआयपी नुसार नाशिक, सातारा, पुणे, भंडारा, वर्धा,चंद्रपूर जिल्हयांनी निवडलेल्या एकुण २५० उपकेंद्रात Health Wellness Centre - आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करावयाचे आहे. या उपकेंद्रातील Health Wellness Centre - आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये प्रत्येकी एक बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करायची आहे.

या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ च्या दि.१०/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाच्या ज्या सुचना देण्यात आल्या होत्या त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

1. बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करतांना गुणवत्तेनुसार नियुक्ती करण्यात यावी.
2. उमेदवारांची शैक्षणिक पदवी, पदव्युत्तर पदवी व अनुभव यांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करावी. शैक्षणिक पदवीमध्ये बी.ए.एम.एस. पदवीतील सरासरी गुणवत्ता ग्राह्य धरावी व यास ८० टक्के weightage देण्यात यावेत. पदव्युत्तर पदवीस १० टक्के व अनुभवास १० टक्के असे १०० टक्क्यांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करावी.
3. गुणवत्ता यादीनुसार (मुलाखत प्रक्रिया न करता) उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

**Health Wellness Centre - आरोग्यवर्धिनी** केंद्र मध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिका-यांना मुळ वेतन रु. २५,०००/- व प्रोत्साहन भत्ता रु.१५,०००/- देय आहे. प्रोत्साहन भत्त्याच्या मार्गदर्शक सुचना या कार्यालयाकडून निर्गमित झाल्यानंतर त्यांनी केलेल्या कामानुसार प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात यावा. सध्या आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिका-यांना दरमहा वेतन रु. २५,०००/- देण्यात यावे.

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र, मुंबई

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादरः-

१. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक सार्वजनिक आरोग्यविभाग मंत्रालय गो. ते.रुग्णालय, मुंबई
२. मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई, महाराष्ट्र.
३. उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक, नागपूर, मंडळ